मानव विकास कार्यक्रमांतर्गत अनु.जाती/ अनु. जमाती / दारिद्र रेषेखालील बाळंत महिलेला देण्यात येणाऱ्या बुडीत मजूरीत वाढ करणेबाबत..

# महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः माविका-२०११/प्र.क्र.१०८/का.१४१८

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक: १७ फेब्रुवारी, २०१४

वाचा

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८,दि.१९ जुलै,२०११
२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र माविका-२०१२/प्र.क्र.६९/का.१४१८,दि.१२ जुलै,२०१२.

प्रस्तावना

शासन निर्णय, नियोजन विभाग, दि. १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील निवडलेल्या २२ अतिमागास जिल्ह्यांतील १२५ तालुक्यांमध्ये मानव विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय, नियोजन विभाग, दि. १२ जुलै, २०१२ अन्वये हा कार्यक्रम सन २०१२-१३ पासून निवडलेल्या १२५ तालुक्यातील “क” वर्ग नगरपालिकांमध्ये राबविण्यात येत आहे.

२. उपरोक्त शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असलेल्या आरोग्य विषयक योजनांमध्ये “अनु.जाती/ अनु.जमाती/ दारिद्र रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे” या योजनेचा समावेश आहे. तथापि, दि. १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये, अनु.जाती/अनु.जमाती/दारिद्र रेषेखालील बाळंत महिलेला सध्या देण्यात येत असलेली बुडीत मजूरीची रक्कम ₹ ८००/- ही अत्यल्प असल्यामुळे त्यात वाढ करण्याबाबत नागपूर अधिवेशन कालावधीत मा. अपर मुख्य सचिव (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे शुक्रवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. तसेच मा. उपमुख्यमंत्री (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३ जुलै, २०१३ रोजी झालेल्या आढावा बैठकीच्यावेळी अनु.जाती/अनु.जमाती/दारिद्र रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे या योजनेअंतर्गत, सध्या बाळंत महिलेला नवव्या महिन्यात देण्यात येणाऱ्या बुडीत मजूरीचा लाभ बाळंतपणानंतरही पुढे एक महिन्यासाठी हा लाभ देता येईल का? याबाबत अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते.

३. अनु.जाती/अनु.जमाती/दारिद्र रेषेखालील गर्भवती आणि बाळंत महिलांना विश्रांती घेण्याकरीता मदत करणे, त्यांना किमान आहार व्यवस्थित घेण्याकरीता सहाय्य करणे, मातेची व बाळाची प्रकृती चांगली राहण्याकरीता मदत करणे आणि अर्भक मृत्यु / कुपोषित बालकांचे प्रमाण कमी करणे या दृष्टीने अनु.जाती/अनु.जमाती/दारिद्र रेषेखालील बाळंत महिलांना देण्यात येणाऱ्या बुडीत मजुरीच्या रक्कमेत वाढ

करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या प्रस्तावास अनुसरून शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय

४. दि. १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये, अनु.जाती/अनु.जमाती/दारिद्र रेषेखालील बाळंत महिलेला सध्या देण्यात येत असलेली बुडीत मजूरीची ₹ ८००/- रक्कम ही अत्यंत कमी असल्याने या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलेस बुडीत मजूरीची रक्कम ₹ २०००/- इतकी वाढविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. सदरचा लाभ लाभार्थी महिलेला प्रसूतीपूर्वीच्या एक महिन्यासाठी व प्रसूतीनंतरच्या एक महिन्यासाठी अशाप्रकारे एकुण दोन महिन्यांसाठी देय राहील. सदर लाभापोटी देय असलेली एकुण ₹ ४०००/- इतकी रक्कम लाभार्थी महिलेच्या राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोष्ट ऑफिसमध्ये उघडलेल्या बचत खात्यामध्ये, गरोदरपणाच्या सातव्या महिन्यापासून ते नवव्या महिन्यापर्यंतच्या कालावधीमध्ये प्रसूतीपूर्व जमा करण्यात यावी. सदर योजनेच्या अटी व शर्ती शासन निर्णय, नियोजन विभाग, दिनांक १९ जुलै, २०११ प्रमाणेच राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक **२०१४०२१७१५३६११८६१६** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JAGTAP ASHOK K

Digitally signed by JAGTAP ASHOK K
DN: c=IN, o=Goverment of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=JAGTAP ASHOK K
Date: 2014.02.18 12:55:17 +05'30'

**(अ.कृ.जगताप)**
शासनाचे सह सचिव

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा. मंत्री/ राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव.
५. मा. कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
६. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
७. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८. महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०.शासनाचे मुख्य सचिव,
११.शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,

१२.महासंचालक,यशदा,पुणे
१३.सदस्य सचिव, उर्वरीत वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
१४.सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,नवीन प्रशासकीय इमारत, तळ मजला,औरंगाबाद
१५.सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ, B-२३/१, साऊथ अंबाझरी मार्ग ,अंध विद्यालयाजवळ, नागपूर
१६.आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, बाबा पेट्रोलपंपजवळ, अदालत रोड, औरंगाबाद
१७.विभागीय आयुक्त, (सर्व)
१८. जिल्हाधिकारी, (सर्व)
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व)
२०.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२१.संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२२.अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२३.उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय,(सर्व)
२४.जिल्हा नियोजन अधिकारी, (सर्व)
२५.गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
२६.संचालक, रेशीम संचालनालय, नागपूर
२७.संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२८. संचालक, शिक्षण संचालनालय, पुणे
२९.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई
३०.आयुक्त, कृषी, पुणे
३१.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, (सर्व)
३२.जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
३३.मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, (सर्व)
३४.नियोजन विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव
३५.निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग